नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे


YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - ३३४ Issue - 334 | वार शनिवार दि. २५ एप्रिल २०२६ Blow- Saturday Date 25 April 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## आपच्या १० पैंकी ७ राज्यसभा खासदारांचा भाजपमध्ये प्रवेश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : पश्चिम बंगाल आणि तामिळनाडूत शुक्रवारी विधानसभेसाठी विक्रमी मतदान झाले. यामुळे पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी आणि तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम के स्टॅलिन यांची धाकधूक वाढली आहे. भाजपचा आत्मविश्वास बळावला आहे. राजकीय तर्कवितर्कांना उधाण आले आहे. अशातच दिल्लीतून एक म ोठी बातमी आली आहे. आम आदमी पार्टीच्या राज्यसभेतील दहा पैकी सात खासदारांनी भाजपमध्ये प्रवेश केला आहे. या खासदारांपैकी राघव चड्ढा, संदीप पाठक, अशोक मित्तल यांनी दिल्लीतच पत्रकार परिषद घेऊन 'आप'पासून दूर आणि जनतेच्या जवळ जात असल्याचे जाहीर केले. भ्रष्टाचार निर्मुलनाच्या हेतूने स्थापन झालेली आम आदमी पार्टी उद्देशांपासून दूर भरकटली असल्याचा आरोप त्यांनी केला. यानंतर काही तासांनी राघव चड्ढा, संदीप पाठक, अशोक मित्तल यांनी भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन यांची भेट घेतली. याप्रसंगी नितीन नवीन यांनी राघव चड्ढा, संदीप पाठक, अशोक मित्तल यांना मिठाई भरवली.



राघव चड्ढा यांनी एक सोशल मीडिया पोस्ट केली. भारताच्या संविधानातील तरतुदींआधारे राज्यसभेतील आम आदमी पार्टीचे दोन-तृतीयांशपेक्षा जास्त खासदार भाजपमध्ये विलीन झाले आहेत. राज्यसभा अध्यक्षांना सादर केलेल्या दस्तऐवजावर सात खासदारांनी स्व-ाक्षरी केली आहे. मी, इतर दोन खासदारांसोबत, स्वतः स्वाक्षरी केलेला दस्तऐवज सादर केला; असे सांगत चड्ढा यांनी आम आदमी पार्टीला 'दे धक्का' दिल्याचे अधिकृतरित्या जाहीर केले.

आम आदमी पार्टीच्या राज्यसभेत असलेल्या राघव चड्ढा, संदीप पाठक, अशोक मित्तल, हरभजन सिंह, राजेंद्र गुप्ता, स्वाती मालिवाल, विक्रम साहनी यांनी भाजपमध्ये प्रवेश करत असल्याची माहिती देणाऱ्या पत्रावर सही केली आहे. हे पत्र राघव चड्ढा यांनी संदीप पाठक, अशोक मित्तल यांच्यासोबत राज्यसभेचे सभापती सी. पी. राधाकृष्णन यांना सादर केले आहे. ही औपचारिकता पूर्ण केल्यानंतर पत्रकारांशी बोलताना राघव चड्ढा यांनी संविधानातील तरतुदींआधारे एखाद्या पक्षाच्या दोन तृतियांश किंवा त्यापेक्षा जास्त खासदारांनी दुसऱ्या पक्षात प्रवेश केला तर पक्षांतर बंदी कायदा लागू होत नाही असे सांगितले.

राज्यसभेतल्या आम आदमी पार्टीच्या दहा पैकी सात खासदारांनी भाजपमध्ये प्रवेश केल्यामुळे ज्येष्ठांच्या सभागृहातील भाजपच्या सदस्य संख्येत ७ ने वाढ झाली आहे. 'आप'ला दणका बसण्याआधी भाजपच्या राज्यसभेतील खासदारांची संख्या १०६ होती. या संख्येत आता वाढ झाली असून ती ११३ झाली आहे. एनडीएच्या राज्यसभेतील सदस्यांची संख्या आधी १४१ होती. पण 'आप'च्या सात जणांनी भाजपमध्ये प्रवेश केल्यानंतर एनडीएचे राज्यसभेतील संख्याबळ १४८ वर पोहोचले आहे. यामुळे साध्या (सामान्य) बहुमताच्या जोरावर राज्यसभेतून कोणतेही विधेयक मंजूर करून घेणे एनडीएसाठी अतिशय सोपे झाले आहे. पंजाबच्या राजकारणावर परिणाम होणार : आम आदमी पार्टीच्या राज्यसभेतील ज्या सात खासदारांनी भाजपमध्ये प्रवेश केला आहे त्यातील सहा जण पंजाबचे आहेत. एकट्या स्वाती मालिवाल दिल्लीच्या आहेत आणि उर्वरित सहा जण पंजाबचे आहेत. यामुळे लवकरच पंजाबमधील आम आदमी पार्टीच्या राजकारणावर प्रतिकूल परिणाम दिसून येण्याची शक्यता राजकीय अभ्यासक व्यक्त करत आहेत.

## राष्ट्रवादीपुढे अंतर्गत बंडाळीचे आव्हान; सुनेत्रा, पार्थ आणि जय पवार यांच्यात जबाबदाऱ्यांचे वाटप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : अजित पवार यांच्या अकाली निधनानंतर राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये मोठी संघटनात्मक फेररचना करण्यात आली असून पक्षाच्या नेतृत्वाची धुरा आता तीन पातळ्यांवर विभागण्यात आली आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी ही नवी व्यवस्था लागू केली असून, सुनेत्रा, पार्थ आणि जय पवार यांच्यात जबाबदाऱ्यांचे वाटप करण्यात आले आहे. भविष्यात उद्भवू शकणारा कोणताही राजकीय धोका टाळण्याचा आणि पक्षावर पकड मजबूत करण्याचा प्रयत्न यामागे असल्याचे बोलले जात आहे.

नव्या रचनेनुसार, सुनेत्रा पवार या स्वतः राज्यभर दौरे करून थेट कार्यकर्त्यांशी संवाद साधणार असून पक्ष संघटनेची घडी बसवण्यावर त्यांचा भर असेल. दुसरीकडे, खासदार पार्थ पवार यांच्याकडे दिल्ली आणि मुंबईतील राजकीय कामकाजाची महत्त्वाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. राष्ट्रीय पातळीवरील संपर्क आणि केंद्र सरकारशी समन्वय साधण्यासाठी पार्थ पवार यांची भूमिका निर्णायक ठरणार आहे. तर अजित पवार यांचे धाकटे चिरंजीव जय पवार यांच्याकडे बाराम ती आणि पुणे ग्रामीण भागाची जबाबदारी सोपवून त्यांच्याकडे स्थानिक बालेकिल्ला अबाधित राखण्याचे काम देण्यात आले आहे. जय पवार यांनी गेल्या काही दिवसांपासून बारामती परिसरात जनसंपर्क वाढवला असून, आगामी काळात त्यांची भूमिका अधिक म हत्त्वाची ठरेल असे मानले जात आहे.

अजित पवार यांच्या निधनानंतर पक्षात काही ज्येष्ठ नेत्यांनी नेतृत्वासाठी हालचाली सुरू केल्याच्या चर्चा राजकीय वर्तुळात रंगल्या होत्या. या पार्श्वभूमीवर,



कोणत्याही बाहेरील नेत्याकडे पक्षाची सूत्रे न देता ती कुटुंबातच ठेवण्याचा पवारांचा हा पवित्रा अत्यंत महत्त्व-पूर्ण मानला जात आहे. पार्थ पवार सध्या राज्यसभा सदस्य म्हणून राष्ट्रीय स्तरावर कार्यरत आहेत, तर जय पवार यांनी बारामतीत संघटनात्मक बांधणीवर लक्ष केंद्रित केले आहे. या दोन्ही युवा नेत्यांच्या सक्रियतेमुळे पक्षात आता दुसऱ्या पिढीचे नेतृत्व पुढे येत असल्याचे स्पष्ट झाले आहे.

अंतर्गत राजकारण तापण्याची चिन्हे

दरम्यान, या नव्या बदलांमुळे राष्ट्रवादीतील अंतर्गत राजकारण अधिक तापण्याची चिन्हे आहेत. बारामती पोटनिवडणुकीच्या धामधुमीत २०२९ च्या विधानसभा निवडणुकीच्या चर्चा आतापासूनच सुरू झाल्या आहेत. कार्यकर्त्यांची मागणी असल्यास जय पवार निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याचे संकेत मिळत असतानाच, आमदार रोहित पवार यांनी भविष्यात 'पवार विरुद्ध पवार' अशी लढत होण्याची शक्यता वर्तवली आहे. या विधानामुळे आगामी काळात बाराम तीसह राज्यातील राजकारण कोणत्या दिशेला वळणार, याकडे राजकीय विश्लेषकांचे लक्ष लागले आहे.

### खासदार प्रणिती शिंदे यांच्या पाठपुराव्याला यश

## उजनी धरणातून भीमा नदीत पाणी सोडले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पिण्याच्या पाण्यासह शेती व जनावरांच्या पाण्याच्या तीव्र टंचाईच्या पाचव्या नंबर उजनी धरणातून भीमा नदीमध्ये पाणी सोडण्याचा निर्णय अखेर घेण्यात आला असून आज रात्रीपासून पाणी सोडण्यास सुरुवात करण्यात आली आहे खासदार पणेती शिंदे यांनी केलेल्या सात्यते पूर्ण पाठपुराव्याला यश मिळाले. खासदार शिंदे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदन देत मंगळवेढा पंढरपूर दक्षिण सोलापूर उत्तर सोलापूर अक्कलकोट तालुक्यातील गंभीर पाणीटंचाईची परिस्थिती मांडली होती भीमा नदीची पात्र अनेक ठिकाणी कोरडे पडल्यामुळे पिठी जळून जाण्याचा धोका निर्माण झाला होता




व जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही खासदार पणती शिंदे यांच्या मागणीचा विचार करून प्रशासनाने तातडीने निर्णय घेत उजनी धरणातून भीमा नदीमध्ये पाणी सोडण्याचे आदेश दिले आहेत व रात्रीप-ासून पाणी सोडण्यात सुरुवात झाल्याचे परिसरातील शेतकरी व नागरिक यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

या निर्णयामुळे शेतीसाठी आवश्यक पाणी उपलब्ध होणार आहे. पिण्याचा पाण्याचा प्रश्न काही प्रमाणात सुटण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## पुढील ३-४ दिवस उष्णतेची लाट; हवामान विभागाकडून नागरिकांना सूचना

मुंबई : राज्यात विदर्भासह मराठवाड्यातही उष्णतेचा कहर पाहायला मिळत असून अकोला, वाशिम जिल्ह्यात तापमानाने ४२ अंश सेल्सियसचा टप्पा पार केला आहे. मात्र, दुसरीकडे अवकाळीमुळे काही ठिकाणी वातावरणात बदल झाल्याचं चित्र आहे. तरीही, भारत हवामान विभागाच्या अंदाजानुसार, पुढील ३-४ दिवसांत उत्तर-पश्चिम आणि मध्य भारतात उष्णतेची लाट तीव्र राहणार असून त्याचा परिणाम महाराष्ट्रातही जाणवणार आहे. गेल्या २४ तासांत देशा-तील अनेक भागांप्रमाणेच महाराष्ट्रातही उष्णतेची तीव्रता कायम राहिली. विदर्भ, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रातील काही भागात तापमान ४० अंशांच्या वर पोहोचल्याचं पाहायला मिळालं.

मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात



२४ आणि २५ एप्रिल रोजी विजांच्या कडकडाटासह हलक्या ते मध्यम पा-वसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. तर, विदर्भात २८ एप्रिल रोजी वादळी वाऱ्यासह पावसाचा अंदाज आहे. तसेच, कोकण आणि गोव्यात २४ एप्रिल रोजी काही ठिकाणी पावसाची शक्यता आहे. वादळी वाऱ्यांचा वेग ३० ते ५० किमी प्रतितास राहू शकतो, त्यामुळे शेती व झाडांना काही (पान २ वर...)

## विधानपरिषदेच्या १० जागांसाठी १२ मे रोजी मतदान व मतमोजणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारे होणाऱ्या नऊ जागांकरिता भारत निवडणूक आयोगाने द्विवार्षिक निवडणूक कार्यक्रम जाहीर केला आहे. या नऊ सदस्यांची मुदत १३ मे २०२६ रोजी संपणार आहे. त्याचप्रमाणे डॉ. प्रज्ञा सातव यांच्या राजीनाम्यामुळे रिक्त झालेल्या विधानपरिषदेच्या एका जागेसाठी निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. भारत निवडणूक आयोगाने नऊ जागांसाठी द्विवार्षिक निवडणूक तर एक जागेसाठी पोटनिवडणूक कार्यक्रम घोषित केला आहे. या एकूण १० जागेसाठी मंगळवार १२ मे २०२६ रोजी सकाळी ९ ते दुपारी ४ वाजेपर्यंत मतदान तर सायंकाळी ५ वाजल्यानंतर मतमोजणी करण्यात येणार आहे.

विधानपरिषद सदस्य संजय केणेकर, नीलम गोऱ्हे, उद्धव ठाकरे, संदीप जोशी, दादाराव केचे, अमोल मिटकरी, रणजितसिंह मोहिते-पाटील, राजेश राठोड आणि शशिकांत शिंदे या नऊ सदस्यांच्या सदस्यत्वाची मुदत १३ मे २०२६ रोजी संपणार आहे. त्याचप्रमाणे विधानपरिषद सदस्य डॉ.प्रज्ञा सातव यांच्या सदस्यत्वाची मुदत २७ जुलै २०३० रोजी संपणार आहे.

या निवडणुकीची अधिसूचना गुरूवार, २३ एप्रिल २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात येईल तर नामनिर्देशन पत्र गुरूवार, ३० एप्रिल २०२६ रोजी सादर करण्यात येतील. नामनिर्देशन पत्रांची छाननी शनिवार २ मे २०२६ रोजी तर उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा दिनांक सोमवार ४ मे २०२६ असा आहे. ही संपूर्ण प्रक्रिया बुधवार १३ मे २०२६ रोजी पूर्ण करण्यात येईल, असे मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय, महाराष्ट्र राज्य यांनी कळविले आहे.

### सरकारी निमसरकारी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी समन्वय समितीचा निर्णय

### ऑनलाईन बैठक आणि त्यानंतर निर्णय

## राज्य सरकारी कर्मचारी शिक्षकांचे बेमुदत संप आंदोलन संस्थगित

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यभरातील १७ लाख सरकारी कर्मचारी शिक्षक दिनांक २१ एप्रिल २०२६ पासून त्यांच्या प्रलंबित मागण्यांचा आग्रहासाठी बेमुदत संपावर गेले होते. या संप आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने पुढाकार घेऊन दिनांक २२ एप्रिल २०२६ रोजी मागण्यांवर मुख्य सचिव पा-तळीवर चर्चा केली. यासंदर्भातील माहिती राज्य सरकाकडून जारी करण्यात आल्यानंतर सरकारी निम सरकारी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी समन्वय समिती महाराष्ट्रकडून राज्य सरकारी कर्मचारी शिक्षकांचे बेमुदत संप आंदोलन संस्थगित करण्यात आलं आहे.यासाठी ऑनलाईन बैठक घेण्यात आली होती.

सरकारसोबत काय चर्चा

मागण्यांच्या सनदेत कर्मचाऱ्यांना दिनांक १ मार्च २०२४ पासून राज्याची सुधारित राष्ट्रीय वेतन योजना लागू करण्यात आली आहे. परंतु या संदर्भातील कार्यपद्धती व नियम तसेच बाबत आवश्यक असणारे अधिसूचना प्रस्तुत करण्यात आली नव्हती त्यामुळे १ मार्च २०२४ पासून सेवानिवृत्त झालेल्या ६५०० कर्मचारी शिक्षकांना तात्पुरत्या निवृत्तीवेतनाचे लाभ मिळालेला नाही. सबब संबंधित कर्मचाऱ्यांची मोठी आर्थिक कुटुंबना होत आहे सदरची अधिसूचना पुढील पंधरा दिवसात काढली जाईल, असे लिखित प्रस्तुत केले आहे.



गेल्या पंधरा महिन्यात युती शासनाने आमच्या सात लक्ष विधी आंदोलनाकडे दुर्लक्ष केलेले आहे. त्यामुळे प्रलंबित मागण्याबाबत शासन स्तरावर चर्चा होऊ शकली नाही, या कारणामुळे संघटनेला मुख्यमंत्री स्तरा-वर त्रैमासिक चर्चेसाठीचे व्यासपीठ निर्माण करून देण्याचे शासनाने मान्य केले आहे.

चतुर्थ श्रेणी कर्मचारी आणि वाहन चालक यांची भरती प्रक्रिया सुरू केली जाईल असे आश्वस्त केले आहे. चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना भरती प्रक्रियेत प्राधान्य मिळावे यासाठी सकारात्मक विचार केला जाईल असे सदर इतिवृत्तात स्पष्ट करण्यात आले आहे.

१०:२०:३० वर्षाच्या सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना टप्प्याटप्प्याने लागू करण्याचा विचार करण्यात येईल असे स्पष्ट करण्यात आले आहे. राज्यातील नगरपरिषदा आणि नगरपालिकांचा सन २००५ पा-सूनचा आकृतीबंध तयार करण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येईल असे स्पष्ट करण्यात आले. सेवानिवृत्तीचे वय ६० करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असल्याचे नमूद करण्यात आले आहे. दिनांक १५ मार्च २०२४ चा संचमान्यतेच्या शासन निर्णयातील काही विशिष्ट म ुद्द्यांबाबत अडचणी असल्यास त्या शासनाच्या निदर्शनास आणून द्याव्यात म्हणजे उपाययोजना करता येईल असे सुचविण्यात आले आहे. वरील व इतर अशा १८ मागण्यांबाबत चर्चा झाली व त्या संदर्भातील गोषवारा असणारे लिखित इतिवृत्त संघटनेला दिले.

उपरोक्त लिखित इतिवृत्ताचे आधारे समन्वय समितीच्या घटक संघटनाची आभासी बैठक आज संध्याकाळी सहा वाजता संपन्न झाली या सभेत आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर शासनाकडून कोणती फलप्राप्ती झाली याविषयी समग्र निर्धारना केली. शास-नाने दर्शविलेला सकारात्मकतेबाबत या सभेत शासनाचे आभार मानण्यात आले. सुमारे ८६ राज्य स्तरावरील प्रतिनिधींनी या सभेत सहभाग केला होता. या सभेत दिनांक २१ एप्रिल २०२६ पासून सुरू असलेला बेमुदत संप आंदोलन उद्या दिनांक २५ एप्रिल २०२६ पासून संस्थगित करण्यात आल्याची घोषणा विश्वास काटकर निमंत्रक यांनी केली या सभेचे अध्यक्ष अशोक दगडे होते.

## संपादकीय....

### आंदोलन संस्थगित

राज्यभरातील १७ लाख सरकारी कर्मचारी शिक्षक दिनांक २१ एप्रिल २०२६ पासून त्यांच्या प्रलंबित मागण्यांचा आग्रहासाठी बेमुदत संपावर गेले होते. या संप आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने पुढाकार घेऊन दिनांक २२ एप्रिल २०२६ रोजी मागण्यांवर मुख्य सचिव पातळी-वर चर्चा केली. यासंदर्भातील माहिती राज्य सरकाकडून जारी करण्यात आल्यानंतर सरकारी निमसरकारी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी समन्वय समिती महाराष्ट्रकडून राज्य सरकारी कर्मचारी शिक्षकांचे बेमुदत संप आंदोलन संस्थगित करण्यात आलं आहे.यासाठी ऑनलाईन बैठक घेण्यात आली होती. मागण्यांच्या सनदेत कर्मचाऱ्यांना दिनांक १ मार्च २०२४ पासून राज्याची सुधारित राष्ट्रीय वेतन योजना लागू करण्यात आली आहे. परंतु या संदर्भातील कार्यपद्धती व नियम तसेच बाबत आवश्यक असणारे अधिसूचना प्रस्तुत करण्यात आली नव्हती त्यामुळे १ मार्च २०२४ पासून सेवानिवृत्त झालेल्या ६५०० कर्मचारी शिक्षकांना तात्पुरत्या निवृत्तीवेतनाचे लाभ मिळालेला नाही. सबब संबंधित कर्मचाऱ्यांची मोठी आर्थिक कुटुंबना होत आहे सदरची अधिसूचना पुढील पंधरा दिवसात काढली जाईल, असे लिखित प्रस्तुत केले आहे. गेल्या पंधरा महिन्यात युती शासनाने आमच्या सात लक्ष विधी आंदोलनाकडे दुर्लक्ष केलेले आहे. त्यामुळे प्रलंबित मागण्याबाबत शासन स्तरावर चर्चा होऊ शकली नाही, या कारणामुळे संघटनेला मुख्यमंत्री स्तरावर त्रैमासिक चर्चेसाठीचे व्यासपीठ निर्माण करून देण्याचे शासनाने मान्य केले आहे.

# दूध भेसळ रोखण्यासाठी ‘आयआयटी’च्या सहकार्याने ‘एआय’ आधारित यंत्रणा तयार करावी : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यात दुग्धजन्य पदार्थांतील भेसळ रोखण्यासाठी राष्ट्रीय डेअरी विकास बोर्डाने टेस्ट स्ट्रीप तयार केली आहे. मात्र, दुधातील भेसळ रोखण्यासाठी राष्ट्रीय डेअरी विकास बोर्ड व आयआयटी यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून यंत्रणा तयार करावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

राष्ट्रीय डेअरी विकास बोर्डचे अध्यक्ष मीनेश शाह यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची वर्षा निवासस्थानी भेट घेऊन राष्ट्रीय डेअरी विकास बोर्डच्या वतीने राज्यात सुरू असलेल्या कामकाजाची माहिती दिली. या बैठकीस मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्रा, मुख्यमंत्री कार्यालयाचे प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी, दुग्धविकास विभागाचे सचिव डॉ. एन. रामास्वामी, महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघाचे व्यवस्थापकीय संचालक अनिल हातेकर, नॅशनल हेवी इंजिनियरिंग कॉपरेटिव्ह लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक संतोष थॉमस, एनडीडीबीचे क्षेत्रीय प्रमुख व्ही. श्रीनिवास, विदर्भ मराठवाडा डेअरी विकास प्रकल्प संचालक डॉ. संजय गोरानी, मदर डेअरीचे उप महाव्यवस्थापक गौरव गुप्ता उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, राज्यात सध्या ४० टक्के दूध संघटित क्षेत्रातून प्रक्रिया केले जाते. तर उर्वरित दूध असंघटीत क्षेत्रातून येत असल्याने भेसळीचे प्रमाण मोठया प्रमाणावर आढळते. त्यामुळे अधिकाधिक उत्पादक आणि गावांना संघटित डेअरी व्यवस्थेत आणण्यावर शासनाचा भर आहे. देशभरात ७५ हजार नवीन गावे सहकारी व्यवस्थेत जोडण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. यामुळे शेतकऱ्यांना अधिक लाभ मिळण्यासोबतच भेसळ रोखण्यास मदत होणार आहे. दूध भेसळ रोखण्यासाठी विशेष टेस्ट स्ट्रिप विकसित करण्यात आली असून ही स्ट्रिप यूरिया तसेच इतर भेसळ घटक ओळखण्यास सक्षम असून पुढील सहा महिन्यांत ती पूर्णपणे कार्यान्वित होईल. असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

मीनेश शाह म्हणाले की, राज्य शासनाने केलेल्या सहकार्यामुळे महानंदच्या पुनरुज्जीवनाला गती मिळाली असून सुमारे ७८ टक्के काम पूर्ण झाले आहे. ३ लाख लिटर क्षमतेचा नवीन ग्रीनफिल्ड डेअरी प्रकल्प उभारण्यात येणार आहे. महानंदा परिसरात सिग्नेचर पार्लर आणि अत्याधुनिक इमारत उभारण्यात आल्या आहेत. आरे आणि महानंदा यांच्या ब्रँडचे रिलाँचिंग लवकरच करण्यात येईल. मुंबईतील आरे कॉलनीमध्ये कंप्रेस्ड बायोगॅस प्रकल्प तसेच उदगीर येथे महानंदचे नवीन डेअरी प्लांट उभारण्यात येणार आहे. नागपूरमधील बुटीबोरी येथे अत्याधुनिक डेअरी प्रकल्प उभारण्यात येणार आहे. तसेच राष्ट्रीय डेअरी विकास बोर्डाच्या वतीने विदर्भ व मराठवाड्यातील १९ जिल्ह्यात दुधसंकलन वाढविण्यात येत



आहे. दुध आणि दुग्धजन्य पदार्थाच्या चाचणीसाठी केंद्र शासनाच्या एनपीडीडी योजनेअतंर्गत महानंद डेअरीमध्ये अत्याधुनिक प्रयोगशाळा उभारण्यात आली असल्याचे मीनेश शाह यांनी सांगितले.

## पुढील ३-४ दिवस उष्णतेची लाट; हवामान विभागाकडून नागरिकांना सूचना

(पान १ वरून..) प्रमाणात नुकसान होण्याची शक्यता आहे. महाराष्ट्रातील अनेक भागात तापमान सरासरीपेक्षा जास्त राहण्याची शक्यता असून उष्णतेमुळे नागरिकांना त्रास होऊ शकतो. विशेषतः विदर्भ आणि मराठवाड्यात उकाडा अधिक जाणवेल, असा अंदाज केंद्रीय हवामान विभागाने वर्तवला आहे. हवामान विभागाने शेतकऱ्यांनाही महत्त्वाच्या सूचना केल्या आहेत. त्यानुसार, पिकांना सकाळी किंवा संध्याकाळी हलके पाणी द्यावे, जमिनीत ओलावा टिकवण्यासाठी मल्चिंगचा वापर करावा. नव्या लागवडीवर सावलीसाठी जाळी वापरावे, असे सूचवण्यात आले आहे. नागरिकांनी शक्यतो दुपारच्या उन्हात बाहेर पडणे टाळावे, भरपूर पाणी आणि द्रवपदार्थ घ्यावेत, हलके, सैल कपडे वापरावेत, असे हवमान विभागाने म्हटलं आहे. तसेच, हवामान विभागाने उष्णतेबरोबरच वादळी पावसाच्या शक्यतेमुळेही नागरिक आणि शेतकऱ्यांनी सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.

## निवडणुकीनंतर पेट्रोल आणि डिझेलच्या दरात वाढ होणार?

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दिल्ली : सध्या देशातील काही राज्यांमध्ये निवडणुका सुरु आहेत. या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पेट्रोल आणि डिझेलच्या किमतींबाबत एक मोठी बातमी समोर आली आहे. निवडणुकांनंतर पेट्रोल आणि डिझेलच्या किंमती २८ रुपयांपर्यंत वाढू शकतात, अशी चर्चा सुरु आहे. काही अहवालात तसा दावा करण्यात आला आहे. यावर आता सरकारने प्रतिक्रिया दिली आहे. पेट्रोलियम मंत्रालयाने असे अहवाल खोटे असल्याचे म्हटले आहे. दर वाढण्याचे दावे सरकारने फेटाळून लावले आहेत.

पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, काही अहवालांमध्ये पेट्रोल आणि डिझेलच्या किमती वाढणार असल्याचे सूचित केले जात आहे. हे स्पष्ट करण्यात येत आहे की, सरकारकडून असा कोणताही प्रस्ताव विचाराधीन नाही. नागरिकांमध्ये भीती आणि घबराट निर्माण करण्यासाठी अशा बातम्या पसरवल्या जात असून, त्या द्वेषपूर्ण आणि दिशाभूल करणाऱ्या आहेत. वास्तविक पाहता, भारत हा एकमेव देश आहे जिथे गेल्या चार वर्षांत पेट्रोल आणि डिझेलच्या किमती वाढलेल्या नाहीत. भारत सरकार आणि तेल सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यांनी आंतरराष्ट्रीय किमतींमधील तीव्र वाढीपासून भारतीय नागरिकांचे संरक्षण करण्यासाठी सातत्याने पावले उचलली आहेत.

कच्च्या तेलाच्या किमती प्रति बॅरल सुमारे १२० डॉलरवर स्थिर असल्याने तेल कंपन्या आणि सरकारवर मोठा आर्थिक दबाव येत आहे. सरकारी तेल कंपन्यांना दरमहा अंदाजे २७००० कोटी रुपयांचा तोटा होत आहे. ही परिस्थिती जास्त काळ टिकू शकत नाही. सध्या, सरकारने प्रति लिटर १० रुपयांची उत्पादन शुल्क कपात आणि विंडफॉल टॅक्स यांसारखी पावले उचलली आहेत, परंतु हा केवळ तात्पुरता दिलासा आहे, कायमस्वरूपी उपाय नाही, असा दावा एकाअहवालात करण्यात आला आहे. मात्र, सरकारने अहवालातील हे सर्व दावे फेटाळून लावले आहेत.

एका अहवालात दिलेल्या माहितीनुसार, कच्च्या तेलाच्या किमतीतील वाढीमागे जागतिक घटकही महत्त्वाचे आहेत. पश्चिम आशियातील सध्याचा तणाव, विशेषत: होर्मुझच्या सामुद्रधुनीतील अडथळ्यांमुळे पुरवठ्यावर परिणाम होत आहे. यामुळेच आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमती सातत्याने जास्त आहेत आणि याचा थेट परिणाम भारतावर होत आहे. कच्च्या तेलाची आयात १३ ते १५ टक्क्यांनी घटली असली तरी, वाढलेल्या किमतींमुळे एकूण आयात बिलात दररोज१९० ते २१० दशलक्ष डॉलर्सची वाढ झाली आहे. यावरून हे स्पष्ट होते की, दरवाढीचा परिणाम आयातीच्या प्रमाणापेक्षा अधिक असल्याचे अहवालात म्हटले आहे.

## ‘एसटी’ची सेवा अधिक लोकाभिमुख करण्यासाठी प्रयत्नशील : मंत्री प्रताप सरनाईक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई : एसटी ही महाराष्ट्राची लोकवाहिनी असून ती अधिक गतिमान, सुरक्षित आणि आरामदायी करण्यासाठी राज्य शासनाने अनेक महत्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. त्यामुळे सर्वसामान्य जनतेच्या जिव्हाळ्याची ’एसटी’ लवकरच नव्या रूपात जनतेसमोर येईल, असे प्रतिपादन परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी केले.

राज्यातील अधिस्वीकृतीधारक पत्रकारांना महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसेसमधून मोफत प्रवासाची सुविधा दिली जाते. या सुविधेचा लाभ सुलभपणे घेण्यासाठी एनसीएमसी स्मार्ट कार्ड वितरण मंत्रालयातील पत्रकार कक्षात करण्यात आले. यावेळी अभिनेते रितेश देशमुख, एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर, वित्तीय सल्लागार गिरीश देशमुख, मंत्रालय व विधिमंडळ वार्ताहर संघाचे अध्यक्ष दिलीप सपाटे, सरचिटणीस दीपक भातुसे तसेच पत्रकार उपस्थित होते.

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक आणि अभिनेता रितेश देशमुख यांच्या हस्ते वरिष्ठ पत्रकारांना स्मार्ट कार्डचे वितरण करण्यात आले. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले की, एसटीच्या ताफ्यात मोठ्या प्रमाणावर इलेक्ट्रिक बसेस समाविष्ट करण्यात येत असून, येत्या काही वर्षात डिझेलवर चालणाऱ्या बस टप्प्याटप्प्याने बंद केल्या जातील. यामुळे पर्यावरण संवर्धनालाही चालना मिळेल. एसटी स्थानकांची स्वच्छता राखण्यासाठी खाजगी कंत्राटे देण्यात आली असून, दर चार तासांनी स्वच्छतागृहांची साफसफाई केली जाईल. बस स्थानकेही स्वच्छ व सुटसुटीत ठेवण्यावर भर दिला जाणार आहे. त्यामुळे लवकरच एसटीचा चेहरामोहरा पूर्णपणे बदललेला दिसेल, असेही परिवहन मंत्री सरनाईक यांनी सांगितले.

एसटीचे ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून अभिनेते रितेश देशमुख आणि जेनेलिया देशमुख यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ही जबाबदारी स्वीकारल्याबद्दल परिवहन मंत्री सरनाईक यांनी दोघांचे आभार मानले.

अभिनेता रितेश देशमुख यांनी सांगितले की, त्यांचे वडील आणि माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी परिवहन खाते सांभाळले होते. एसटी हा त्यांच्यासाठी अत्यंत जिव्हाळ्याचा विषय होता. त्यामुळे कोणतीही अपेक्षा न ठेवता आपण एसटीचे ब्रँड ॲम्बेसेडर होण्याचा निर्णय घेतला.

# परदेशी अहवाल आणा किंवा आंतरदेशी अहवाल आणा, पण सातबारा कोरा झालाच पाहिजे; राजू शेट्टींचा मुख्यमंत्र्यांना इशारा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या आश्वासनाप्रमाणे शेतकऱ्यांचा सातबारा कोरा झालाच पाहिजे. यासाठी परदेशी अहवाल आणा किंवा आंतरदेशीय अहवाल आणा पण सातबारा कोरा करा असा इशारा स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनी दिला आहे. तसेच शक्तीपीठ महामार्ग हा २०२९ निवडणुकीमध्ये निधी उभा करण्यासाठी सुरु असलेला भ्रष्टाचार आहे, असे म्हणत नवीन शक्तीपीठ महामार्गालाही राजू शेट्टींनी विरोध दर्शवला आहे.

शक्तीपीठ महामार्गाला आमचा विरोधच

शेतकऱ्यांना सध्या जून महिन्याची वाट असून मुख्यमंर्त्यानी दिलेल्या आश्वासनाप्रमाणे शेतकऱ्याचा सातबारा कोरा झालाच पाहिजे यासाठी परदेशी अहवाल आणा किंवा आंतरदेशीय अहवाल ठाणा पण सातबारा कोरा करा असा इशारा स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनी दिला आहे. कर्जमाफी वरील प्रवीण परदेशी यांच्या अहवालावर राजू शेट्टी यांनी खास शैलीत हा इशारा दिला आहे. शक्तीपीठ महामार्गाला शेतकऱ्यांनी विरोध केल्यानंतर मुख्यमंर्त्यानी नवीन मार्गाची घोषणा केली आहे, पण या नवीन मार्गालाही आमचा विरोधच असून आम्ही जागा देणार नाही असा इशारा राजू शेट्टी यांनी दिला आहे.

शेतकऱ्यांच्या परवानगीशिवाय मोजणी होणार नाही

शक्तीपीठ महामार्गासाठी एक लाख कोटीचे कर्ज महाराष्ट्रावर येणार असून याचा खर्च फक्त चाळीस हजार कोटी आहे. वरचे साठ हजार कोटी रुपये हे २०२९ च्या निवडणुकांसाठी निधी उभा करण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा गंभीर आरोपही राजू शेट्टी यांनी केला. आधीच महाराष्ट्रावर नऊ लाख कोटीचे कर्ज असून कोणाच्या निवडणूक निधीसाठी आम्ही हा महामार्ग होऊ देणार नसल्याचा इशाराही त्यांनी दिला आहे. वास्तविक याच महामार्गाला नागपूर रत्नागिरी हा दुसरा महामार्ग बनविण्यात आला आहे. या महामार्गावर केंद्र सरकारने प्रतिसाठ किलोमीटर टूल बसवले असून यातून रोज ४० लाख रुपयाचे उत्पन्न



अपेक्षित होते मात्र येथून रोज फक्त आठ ते नऊ लाख रुपये एवढा टोल मिळत असल्याने येथील वाहतूक केवळ पंचवीस टक्के एवढीच असल्याचे शेट्टी यांनी दाखवून दिले आहे. त्यामुळे पहिल्याच मार्गावरून वाहतूक नसताना शक्तीपीठ महामार्गाची गरज नसल्याचे शेट्टी यांनी सांगितले आहे. त्यामुळे संयुक्त मोजणीला अधिकारी आल्यास शेतकऱ्याच्या परवानगीशिवाय मोजणी होणार नसल्याचा इशाराही राजू शेट्टी यांनी दिला आहे. शक्तिपीठ महामार्गाला कोल्हापूर भागातून झालेल्या विरोधानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या मार्गाची संपूर्ण अलाइनमेंट बदलून नवीन मार्ग बनविला होता. मात्र आता राजू शेट्टी यांनी या मार्गासही विरोध करण्यास सुरुवात केली आहे.

# कृत्रिम बुद्धिमत्तेला संवेदनशील बनवण्याबाबत चिंतन व्हावे : राज्यपाल जिष्णु देव वर्मा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : आगामी काळात कृत्रिम बुद्धिमत्ता व मशीन लर्निंग विविध क्षेत्रात मोठी भूमिका बजावणार आहे. त्याचे लाभ जसे अनेक आहेत तसेच त्यातून अनेक समस्या देखील निर्माण होऊ शकतात. त्यामुळे कृत्रिम बुद्धिमत्तेला अधिक संवेदनशील बनवण्याबाबत चिंतन झाले पाहिजे. कृत्रिम बुद्धिमत्तेची व्याप्ती वाढवून समाजाच्या शेवटच्या घटकातील लोकांना घेऊन समावेशी विकास झाला पाहिजे, असे प्रतिपादन राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी केले.

नाविन्यपूर्ण कौशल्याधारित शिक्षणाला चालना देण्यासाठी मुंबई येथील टलास स्किलटेक युनिव्हर्सिटीने सुरु केलेल्या ‘सेंटर फॉर इनोव्हेशन‘चे उदघाटन राज्यपालांच्या हस्ते संस्थेच्या बीकेसी येथील शैक्षणिक संकुलात झाले, त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी ओ. पी. जिंदल ग्लोबल युनिव्हर्सिटीने ‘सिरील श्रॉफ सेन्टर ऑफ एआय, लॉ अँड रेग्युलेशन‘ यांच्या सहकार्याने आयोजित ‘गव्हर्निंग एआय : कायदा, तंत्रज्ञान व समाज‘ या विषयावरील चर्चासत्राचे देखील उदघाटन राज्यपालांनी केले.

तंत्रज्ञान उपलब्ध असणे, परंतु ठोस उद्दिष्ट समोर नसणे; किंवा विज्ञान उपलब्ध असणे, परंतु त्याला मानवी मूल्यांची जोड नसणे धोक्याचे असते, असे सांगून कृत्रिम बुद्धिमत्तेचे नियमन करताना दया, अनुकंपा व सहानुभूतीचा त्यामध्ये अंतर्भाव असला पाहिजे असे राज्यपालांनी सांगितले. या दृष्टीने शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये दुर्बल घटकांबद्दल अनुकंपा सहानुभूती बाणवली पाहिजे, असे आवाहन राज्यपालांनी केले.

पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांनी ‘जय जवान‘ या घोषणेला ‘जय किसान‘ची घोषणेची जोड दिली होती. त्यानंतर पंतप्रधान वाजपेयी यांनी आपल्या काळात त्याला ‘जय विज्ञान‘ची जोड दिली व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्या घोषणेला ‘जय अनुसंधान‘ची जोड दिली असे सांगून सध्याचे युग हे विज्ञान व नवोन्मेषाचे असल्याचे राज्यपालांनी सांगितले.

‘विकसित भारत‘ संज्ञेचा अर्थ आर्थिक दृष्ट्या संपन्न भारत इतका मर्यादित नाही असे सांगून ‘विकसित भारत‘ म्हणजे ‘सर्वे भवन्तु सुखिनः, सर्वे संतु निरामय‘ हा आहे व त्याकरिता प्रत्येक व्यक्तीचा विकास होणे आवश्यक आहे असे राज्यपालांनी सांगितले.

नामशेष होत असलेल्या कलांचे जतन व्हावे

आधुनिकीकरण तसेच मोठ्या प्रमाणावर यंत्रनिर्मित वस्तूंचा वापर वाढल्यामुळे आज जगभरातील हजारो पारंपरिक कला प्रकार आणि हस्तकला नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. एक कला जरी नामशेष झाली तरी आपण आपली सांस्कृतिक ओळख गमावतो. त्यामुळे नामशेष होत असलेल्या कलांचे जतन व संवर्धन झाले पाहिजे व त्यासाठी विद्यापीठांनी पुढाकार घेतला पाहिजे असे राज्यपालांनी सांगितले.

एखादी दुर्मिळ कला वाचवणे म्हणजे तिला संग्रहालयात बंदिस्त करणे असे नसून तिला नवसंजीवनी देणे होय असे राज्यपालांनी सांगितले. या कार्यात टलास कौशल्य विद्यापीठाने देखील पुढाकार घ्यावा असे आवाहन राज्यपालांनी यावेळी केले.

राज्यपालांच्या हस्ते यावेळी ओ. पी. जिंदल ग्लोबल विद्यापीठातर्फे प्रकाशित एआय गव्हर्नन्स अहवालाचे प्रकाशन करण्यात आले.

टलास स्किलटेक विद्यापीठाच्या संस्थापिका डॉ. इंदू शहानी यांनी प्रास्ताविक केले तर ओ.पी. जिंदल ग्लोबल विद्यापीठाचे कुलगुरु सी राज कुमार यांनी ‘गव्हर्निंग एआय‘ या विषयावरील राष्ट्रीय चर्चासत्राची भूमिका विशद केली. सुरुवातीला राज्यपालांनी विद्यापीठाच्या नाविन्यता केंद्राला भेट दिली व विद्यार्थ्यांशी संवाद साधताना त्यांचेकडून नाविन्यपूर्ण उपक्रम व प्रयोगांची माहिती घेतली.

कार्यक्रमाला टलास स्किलटेक युनिव्हर्सिटीचे कार्यकारी अध्यक्ष सिद्धार्थ शहानी, कुलगुरु डॉ राजन वेळूकर, सिरील अमरचंद मंगलदास कंपनीचे व्यवस्थापकीय भागीदार सिरील श्रॉफ, अपग्रॅडचे अध्यक्ष रॉनी स्क्रूवाला, विद्यापीठाचे रजिस्ट्रार पराग अमीन, अध्यापक, निमंत्रित व विद्यार्थी उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# कादवा नदी पानवेलींच्या विळख्यात; निफाड प्रशासनावर नागरिकांचा रोष

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड शहरातील मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीजवळून वाहणारी कादवा नदी सध्या पानवेली (जलकुंभी) च्या प्रचंड वाढीमुळे अक्षरशः गुदमरल्याची अवस्था झाली आहे. नदीच्या पात्रावर मोठ्या प्रमाणात पसरलेल्या या पानवेलीमुळे पाण्याचा नैसर्गिक प्रवाह पूर्णपणे ठप्प झाला असून, पर्यावरणीय तसेच सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे.अशा पध्दतीचा रोष नागरीकांच्या वतीने अभिषेक सांगळे व जयेश जगताप यांनी पत्रकारांशी बोलताना व्यक्त केला आहे.

विशेष म्हणजे, ही समस्या शहराच्या अगदी मध्यवर्ती ठिकाणी प्रशासकीय इमारतीच्या मुख्य प्रवेशद्वारालगत निर्माण झाली असतानाही संबंधित प्रशासनाकडून अद्याप ठोस उपाययोजना करण्यात आलेली नाही. दररोज शेकडो अधिकारी व कर्मचारी या मार्गाने ये-जा करत असतानाही या गंभीर प्रश्नाकडे दुर्लक्ष होत असल्याची भावना नागरिकांमध्ये तीव्र होत आहे. स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, पानवेलीमुळे नदीतील पाणी साचून राहत असल्याने डासांची उत्पत्ती मोठ्या प्रमाणात वाढली आहे. परिणामी मलेरिया, डेंग्यू यांसारख्या संसर्गजन्य आजारांचा धोका दिवसेंदिवस वाढत आहे. त्याचबरोबर, साचलेल्या पाण्यामुळे परिसरात तीव्र दुर्गंधी पसरत असून, पर्यावरणीय समतोल बिघडण्याची भीती व्यक्त केली जात आहे.काही ठिकाणी नदीचे मूळ पात्रच दिसेनासे झाले असून, पानवेलीच्या दाट थरामुळे पाण्याचा प्रवाह अडवला जात आहे. यामुळे पावसाळ्यात पूरस्थिती उद्भवण्याची शक्यता देखील नाकारता येत नाही, असा इशारा जाणकारांकडून दिला जात आहे. नदी स्वच्छता व जलसंधारणाच्या विविध योजना कागदावरच राहिल्याची टीका नागरिकांकडून होत आहे.

**पानवेलीचा विळखा – आरोग्याला धोका**
**पाणी साचल्याने डासांची वाढ**
**मलेरिया, डेंग्यूचा धोका**
**परिसरात दुर्गंधी**
**नदीचा प्रवाह ठप्प**
**पूरस्थितीची शक्यता**





नागरिकांनी प्रशासनाकडे तात्काळ पानवेली काढून टाकण्याची, नदीचे डी-सिल्टिंग (गाळ काढणे) करण्याची आणि नियमित स्वच्छतेची यंत्रणा उभारण्याची मागणी केली आहे. तसेच, भविष्यात अशा प्रकारची परिस्थिती उद्भवू नये यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना राबवण्याची गरज व्यक्त करण्यात आली आहे. दरम्यान, संबंधित विभागाने या समस्येकडे तातडीने लक्ष देऊन प्रभावी कारवाई करावी, अन्यथा आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल, असा इशारा काही नागरिकांनी दिला आहे.

# श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे व्यवस्थापक श्री प्रवीण कुमार घम यांचा यथोचित सन्मान



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर येथील श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे व्यवस्थापक प्रवीण कुमार ज्ञानेश्वर गम यांची नियुक्ती झाल्याबद्दल ते जे न्यूज परिवाराच्या वतीने श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती सदस्य संभाजी शिंदे यांच्या हस्ते शाल पेढे पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला.

यावेळी भाळवणीचे उपसरपंच नितीन शिंदे, उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना गटाचे माळशिरस शहराध्यक्ष अशोक देशमुख, पोलीस अधिकारी नितीन होळकर व मंदिर समितीचे कर्मचारी आधी मान्यवर उपस्थित होते यावेळी तेज न्यूजचे संपादक प्रशांत माळवदे यांनी आभार मानले.

यावेळी संभाजी शिंदे म्हणाले की तेज न्यूज ची संपादक प्रशांत माळवदे यांना नुकताच डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर प्रतिष्ठान पंढरपूर यांच्या डिजिटल मीडियातील उल्लेखनीय कार्याबद्दल प्रशांत माळवदे यांना पुरस्कार देण्यात आला आहे तसेच श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या बातम्या आपल्या डिजिटल मीडियावर कायमस्वरूपी प्रसिद्ध करीत आहे त्याबद्दल मंदिर समिती सदस्य म्हणून मी सत्कार करत आहे असे संभाजी शिंदे यांनी सांगितले यावेळी प्रशांत माळवदे यांनी सर्वांचे आभार मानले.

# सोनालिका समृद्धी ट्रॅक्टर्स, पंढरपूर येथे लकी ड्रॉ संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : पंढरपूर, मंगळवेढा, सांगोला, माढा आणि मोहोळ येथे गुढी पाडावा निम्मित लकी ड्रॉ स्कीम देण्यात आली होती , या लकी ड्रॉ मध्ये प्रत्येकी १० ट्रॅक्टर ग्राहक मध्ये लकी ड्रॉ ही स्कीम ठेवण्यात आली होती , या मध्ये पहिले बक्षीस मोटार सायकल, दुसरे बक्षीस फ्रीज आणि तिसरे बक्षीस कुलर आणि बाकीचे ७ ग्राहकांना फिक्स गिफ्ट या प्रमाणे या लकी ड्रॉची सोडत आज समृद्धी ट्रॅक्टर पंढरपूर येथे संपन्न झाली,

आज दोन लकी ड्रॉ घेण्यात आले

**पहिला लकी ड्रॉ**

या लकी ड्रॉ मध्ये पहिले बक्षीस मा .श्री दिलीप हरी गायकवाड,रा-हलदहिवडी, ता-सांगोला,दुसरे बक्षीस फ्रीज सौ.सुप्रिया सुशांत शेंबडे, तिसरे बक्षीस कुलर मा. श्री मल्हारी पांडुरंग राऊत रा -उपळाई, ता मोहोळ आणि बाकीचे ७ ग्राहक यांना फिक्स गिफ्ट देण्यात आले.

**दुसरा लकी ड्रॉ**



यामध्ये पहिले बक्षिस मोटार सायकल मा .श्री.महेश विश्वंभर देशमुख रा मगरवाडी, ता-पंढरपूर दुसरे बक्षीस फ्रीज मा श्री मारुती धोंडीराम देशमुख रा - वाटांबरे ता सांगोला, तिसरे बक्षीस कुलर युवराज गोरख ढेकळे, रा - बैरागवाडी , ता मोहोळ हे विजेते ठरले आहेत.

ही स्कीम ३० एप्रिल २०२६ पर्यंत वाढवण्यात आली आहे तरी सर्वांनी या स्कीमचा जास्तीत जास्त फायदा घ्यावा असे आव्हान करण्यात आले. तसेच सर्व ट्रॅक्टर खरेदीवर लागू असणाऱ्या सर्व स्कीमची माहिती देण्यात आली. या स्कीम च्या अधिक माहिती साठी समृद्धी ट्रॅक्टर पंढरपूर, मंगळवेढा ,सांगोला , माढा आणि मोहोळ येथे संपर्क करावा.

संपर्क मो नं-७७९८८८८०९९

या कार्यक्रमला सर्व शेतकरी बांधव व समृद्धी ट्रॅक्टर चे सर्व स्टाफ उपस्थित होता.

# निफाड तहसीलच्या वतीने उत्कृष्ट अधिकारी व कर्मचारी यांचा एक मे रोजी सन्मान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : महाराष्ट्र राज्याचा ६७ वा स्थापना दिवस समारंभ एक मे २०२६ रोजी तहसील कार्यालय निफाड येथे साजरा करण्यात येणार असून त्या निमित्ताने वर्षभरात ज्या अधिकारी व कर्मचारी यांनी उत्कृष्ट कामगिरी बजावली त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांचा विधानसभा सदस्य निफाड ,तसेच उपविभागीय अधिकारी ,निफाड यांचे उपस्थितीत गुणगौरव समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे.

या मध्ये नायब तहसीलदार अतुल गायकवाड, सहा.मह. अधिकारी मारुती ठाकरे, महाराजस्व अभियान अंतर्गत उत्कृष्ट कामगिरी केलेले मंडळ अधिकारी, ग्राम .मह. अधिकारी गोरक्ष दाते ईश्वरी देशमुख, महसूल सहाय्यक ललित खैरे, मतदान केंद्रस्तरीय अधिकारी गोकुळ शेलार, बाळकृष्ण शिंदे, जनगणना कक्ष ,प्रमोद चव्हाण, मुकेश सोनवणे, पोलीस पाटील भाग्यश्री श्रीराम बोरसे, शिपाई दामोदर पगारे, महसूल सेवक ताई आहिरे, पिक पाहणी सहाय्यक. राजेश चव्हाण ऋषिकेश चकोर, ऑपरेटर. सारिका कोल्हे रवींद्र, पडोळ, सविता काळे, संदीप खालकर, आपले सरकार सेवा केंद्र. राहुल बर्कले, यांची तालुकास्तरावर उत्कृष्ट कामकाज केल्याबद्दल निवड करण्यात आली आहे, गेल्या वर्षभरात या अधिकारी व कर्मचारी यांनी आपल्या पदाची जबाबदारी सचोटीने पारदर्शकतेने व समर्पक वृत्तीने पार पडली असून त्यांच्या उत्कृष्ट प्रशासकीय कामकाजामुळे विभागाची प्रतिमा उंचावण्यास मुलाची मदत झाली आहे या उल्लेखनीय कामगिरीबद्दल तहसीलदार निफाड कार्यालयाचे वतीने व परिसरातून . अभिनंदन केले जात आहे.

# दैवी शक्तीच्या नावाखाली अत्याचार; भोंदू बाबाकडून महिलेचे लैंगिक शोषण; लासलगाव पोलिसात गुन्हा दाखल





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : घरगुती आणि मानसिक अस्वस्थतेचा ताणतणाव, वैवाहिक अडचणी याचा गैरफायदा घेत निफाड तालुक्यातील धारणगाव खडक येथील एका भोंदू महाराजाने महिलेचे लैंगिक शोषण केल्याची धक्का दायक घटना उघडकीस आली आहे.

या प्रकरणी लासलगाव पोलीस ठाण्यात महेशगिरी ऊर्फ महेश दिलीप काकडे (वय अंदाजे ३१) याच्याविरुद्ध बलात्कारासह जादूटोणाविरोधी कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पीडित महिला (वय २८, रा. उत्तम नगर, नाशिक) हिने दिलेल्या फिर्यादीत नमूद केल्याप्रमाणे, वैयक्तिक आयुष्यातील अडचणींमुळे ती मानसिकदृष्ट्या अस्वस्थ होती. या पार्श्वभूमीवर तिच्या कुटुंबीयांनी तिला धारणगाव खडक येथील तथाकथित मठात नेले. आरोपी काकडे हा स्वतःमध्ये दैवी शक्ती असल्याचा दावा करत महिलांवरील भुताटकी काढण्याचे काम करत असल्याचे भासवत होता. १५ ऑगस्ट २०२४ रोजी मठात गेल्यानंतर आरोपीने पीडितेच्या अंगात 'करणीबाधा' असल्याचे सांगून विविध धार्मिक विधी करण्यास भाग पाडले. त्यानंतर तिचा मोबाईल क्रमांक घेऊन वैयक्तिक व अश्लील संदेश पाठवण्यास सुरुवात केली. २३ ऑगस्ट २०२४ रोजी पंचवटी परिसरात भेटीस बोलावून आरोपीने तिला त्र्यंबकेश्वर रोडवरील एका लॉजवर नेले व 'दैवी शक्ती' असल्याची भीती दाखवून तिच्यावर बळजबरीने लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप आहे.दरम्यान, आरोपीने तिच्या मोबाईलमधील पुरावेही जबरदस्तीने नष्ट केल्याचे समोर आले आहे. नंतर अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कार्यकत्यांनी धीर दिल्यानंतर पीडितेने पुढे येत तक्रार दाखल केली. या प्रकरणात सहाय्यक पोलीस निरीक्षक दीपक पाटील यांनी घटनेची पडताळणी करून आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ अंतर्गत बलात्कारासह महाराष्ट्र नरबळी व अघोरी प्रथा प्रतिबंधक कायदा २०१३ अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

**या भोंदू महाराजाने अशाच प्रकारे इतर महिलांनाही जाळ्यात ओढून शोषण केल्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. अंधश्रद्धा निर्मूलन समितीकडून संभाव्य पीडितांनी पुढे येऊन तक्रार नोंदवावी, असे आवाहन करण्यात आले असून, या प्रकरणाचा सखोल तपास करण्याची मागणी होत आहे.**

**भोंदू महेशगिरी याच्या आश्रमात शासकीय खचनि कामे झाली आहे. त्या कामाच्या बदल्यात हा भोंदू या राजकीय नेत्याचा प्रचार करत असे. अशा लोकांना राजाश्रय मिळाल्याने भोंदूगिरी वाढली आहे.**
**– डॉ. टी. आर. गोराणे, राज्य प्रधान सचिव, अंनिस**

## आमदार अभिजीत पाटील यांच्या हस्ते भूमिपूजन संपन्न

# चिंचोली भोसे येथे रस्ता दुरुस्तीसाठी ₹२० लाखांचा निधी मंजूर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : चिंचोली भोसे, ता. पंढरपूर येथील ग्रामस्थांच्या दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या रस्ता दुरुस्तीच्या मागणीची गांभीर्याने दखल घेत ₹२० लाखांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या विकासकामाचे भूमिपूजन आमदार अभिजीत आबा पाटील यांच्या शुभहस्ते ग्रामस्थांच्या उत्स्फूर्त व मोठ्या उपस्थितीत संपन्न झाले.



चिंचोली भोसे परिसरातील रस्त्याची दुरवस्था ही नागरिकांसाठी मोठी समस्या बनली होती. खराब रस्त्यांमुळे वाहतुकीत अडथळे निर्माण होत होते तसेच शेतकरी, विद्यार्थी आणि सर्वसामान्य नागरिकांना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत होता. मात्र, आता या निधीमुळे रस्त्याचे दर्जेदार दुरुस्ती काम हाती घेतले जाणार असून, लवकरच नागरिकांना सुकर व सुरक्षित वाहतुकीचा लाभ मिळणार आहे.

यावेळी बोलताना आमदार अभिजीत पाटील यांनी सांगितले की, मतदारसंघातील प्रत्येक गावाचा सर्वांगीण विकास हेच आमचे ध्येय असून, नागरिकांच्या मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी आम्ही कायम कटिबद्ध आहोत. रस्ते, पाणी, वीज यांसारख्या सुविधांमध्ये कोणतीही तडजोड होऊ दिली जाणार नाही.

या कार्यक्रमास श्री. उमेश पवार, श्री. गणेश आवटे, श्री. भीमराव पवार, श्री. शशिकांत शिंदे, श्री. परमेश्वर पवार, श्री. बाळासाहेब पवार, श्री. रामभाऊ परचंडे यांच्यासह अनेक मान्यवर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कामामुळे परिसराच्या विकासाला गती मिळणार असून, ग्रामस्थांनी आमदार अभिजीत पाटील यांचे आभार व्यक्त केले आहेत.

# स्वेरीमध्ये 'सिविकॉन ३.०' तांत्रिक महोत्सव यशस्वी संपन्न



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) मध्ये सिव्हिल इंजिनिअरिंग स्टुडंट्स असोसिएशनच्या वतीने दि. ३० मार्च २०२६ रोजी 'सिविकॉन ३.०' या तांत्रिक महोत्सवाचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या उपक्रमाला विद्यार्थ्यांचा उस्फुर्त प्रतिसाद मिळाला.

संस्थेचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी.पी.रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली, कॅम्पस इनचार्ज डॉ.एम.एम.पवार, उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार तसेच सिव्हिल इंजिनिअरिंग विभागाचे प्रमुख डॉ. पी. आर. बामणे यांच्या मार्गदर्शनाखाली व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूरच्या विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. पी.एम. पवार यांच्या उपस्थितीत विभागातील प्राध्यापकांच्या सहकार्याने हा उपक्रम संपन्न झाला. या 'सिविकॉन ३.०' मध्ये आयडीयाथॉन, सॉईल आर्ट, ऑप्टि टेक मास्टर, सिने टेक मास्टर, पोस्टर प्रेझेंटेशन आणि कॅड रेस यांसारख्या विविध तांत्रिक व सर्जनशील स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. शिक्षकांच्या सहकार्यामुळे 'सिविकॉन ३.०' या उपक्रमातील सर्व स्पर्धा व तांत्रिक सत्रे यशस्वीरीत्या पार पडली. यामुळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला व बुद्धिमत्तेला चालना मिळाली असून याचा विद्यार्थ्यांना भविष्यात फायदा होणार आहे, हे मात्र निश्चित! या स्पर्धेमध्ये राज्यातील इतर इंजिनिअरिंग कॉलेज मधील विद्यार्थ्यांसह जवळपास २०० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. प्रा. एम. व्ही. डोंगरे यांनी सेसा समन्वयक म्हणून काम पहिले. उत्तम नियोजन, सक्षम व्यवस्थापन, स्पर्धांचे यशस्वी आयोजन हे समितीमधील सर्व सदस्यांचे कौशल्य ठरले. सर्व विद्यार्थ्यांनीही मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवून कार्यक्रमाच्या यशात मोलाचा वाटा उचलला. 'सिविकॉन ३.०' हा कार्यक्रम विद्यार्थ्यांसाठी ज्ञानवर्धक, प्रेरणादायी व अत्यंत यशस्वी ठरला.

# क्रीडा भारती मुंबई महानगरातर्फे १४ वर्षांखालील मुला-मुलींच्या कबड्डी प्रशिक्षण शिबिराचे उद्घाटन







**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई प्रतिनिधी/केतन भोज : कबड्डी या देशी खेळाला जागतिक स्तरावर नेण्यासाठी आणि भावी आंतरराष्ट्रीय खेळाडू घडवण्याच्या उद्देशाने, क्रीडा भारती मुंबई महानगर यांच्या वतीने दि. १७ ते १९ एप्रिल २०२६ या कालावधीत विशेष प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराचे दिमाखदार उद्घाटन क्रीडा भारतीचे अखिल भारतीय सचिव श्री. राज चौधरी आणि प्रांत मंत्री श्री. बाळ धर्माधिकारी यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. या तीन दिवसीय शिबिरामध्ये मुंबई महानगरातील एकूण १०६ बाल खेळाडूंनी सहभाग नोंदवला आहे. यामध्ये ६८ मुले आणि ३८ मुलींचा समावेश असून, त्यांच्यातील क्रीडा नैपुण्य विकसित करण्यासाठी तज्ज्ञ प्रशिक्षकांकडून मार्गदर्शन दिले जात आहे.

अनुभवी प्रशिक्षक शिबीर प्रमुख सौ. सिमरत गायकवाड आणि सुनील खोपकर यांच्या नेतृत्वाखाली प्रशिक्षकांची मोठी फौज या मुलांवर मेहनत घेत आहे. यामध्ये प्रामुख्याने: उपाध्यक्ष: रवींद्र करमळकर, कार्यवाह: श्री. प्रताप परब, प्रशिक्षक गट: पोर्णिमा राणे, सरिता कदम, योगेश कोकाटे, सरला खरात, वैशाली सावंत, विनीता गुजर, अर्चना गोऊळकर, बुशरा अन्सारी, प्रनिल पानवलकर आणि संतोष साळकर यांचे मार्गदर्शन लाभले. या शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी विठ्ठल जाधव आणि डॉ. प्रागजी वाझा यांचे विशेष सहकार्य लाभले आहे.

जागतिक दर्जाचे खेळाडू घडवण्याचा संकल्प

उद्घाटन प्रसंगी बोलताना मान्यवरांनी सांगितले की, कबड्डी आता केवळ मातीतील खेळ राहिला नसून त्याला जागतिक ग्लॅमर प्राप्त झाले आहे. १४ वर्षांखालील वयोगटातच मुलांवर योग्य संस्कार आणि तंत्रशुद्ध प्रशिक्षण मिळाल्यास, भविष्यात हेच खेळाडू देशाचे प्रतिनिधित्व करतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या शिबिरामुळे उदयोन्मुख खेळाडूंना नवीन तंत्रे शिकायला मिळत असून, क्रीडा प्रेमींकडून या उपक्रमाचे कौतुक होत आहे.

# कळंब परिसरात आस्मानी संकट : आंबा उत्पादकांचे कंबरडे मोडले, भरपाईची मागणी


**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब : प्रतिनिधी, सुधाकर रणदिवे,गेल्या काही दिवसांपासून कळंब आणि परिसरात सुरू असलेल्या लहरी हवामानाचा, विशेषतः ऊन, वारा आणि अवकाळी पावसाचा मोठा फटका फळांचा राजा असलेल्या आंब्याला बसला आहे. या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला गेला असून आंबा उत्पादक शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे.

बाहेरून आलेल्या आंब्याच्या मागणी दरात मोठी वाढ झालेली दिसून येत आहे,

स्थानिक 'गावरान' आंब्याचे पीक मोठ्या प्रमाणावर उद्ध्वस्त झाल्याने बाजारात आंब्याची टंचाई निर्माण झाली आहे. स्थानिक आवक घटल्यामुळे आता ग्राहकांना बाहेरून आलेल्या आंब्यावर अवलंबून राहावे लागत आहे. परिणामी, आंब्याचे दर गगनाला भिडले असून, बाजारात २०० ते ५०० रुपये प्रति किलो दराने आंब्याची विक्री होत आहे.

केवळ कळंबच नव्हे तर संपूर्ण धाराशिव जिल्ह्यातील आंबा बागायतदारांनी तातडीने मदत मिळवण्यासाठी प्रशासनाकडे मागणी केली आहे. कृषी विभागाने बांधावर येऊन नुकसानीची पाहणी करावी आणि बाधित शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, असा सूर ग्रामीण भागातून उमटत आहे.



## अमर चोंदे यांच्या केशर आंब्याचे मोठे नुकसान

**परिसरातील आंबा उत्पादक शेतकरी अमर चोंदे यांच्या बागेतील केशर आंब्याचे वादळी वाऱ्यामुळे प्रचंड नुकसान झाले आहे. काढणीला आलेली फळे जमिनीवर पडल्याने मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. वर्षभर मेहनत करून पीक तयार केले होते, मात्र निसर्गाच्या लहरीपणामुळे सर्व काही वाया गेले आहे, अशी भावना व्यक्त करत चोंदे यांनी शासनाने तातडीने नुकसानीचे पंचनामे करून भरपाई द्यावी, अशी मागणी केली आहे.**

# ईटकुरमध्ये सुफी सय्यद शमशोद्दीन यांची कडाडली तोफ...

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**





ईटकुर प्रतिनिधी/सुधाकर रणदिवे : कळंब तालुक्यातील ईटकुर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त २१ तारखे पासुन विविध कार्यक्रम चालू झालेले आहेत, त्यानिमित्ताने २३ तारखेला महाराष्ट्र पोलीस मित्र सोशल असोसिएशन चे संस्थापक सचिव व युवा भिम सेनेचे संस्थापक प्रवक्ते, अनेक पुरस्काराने सन्मानित झालेले समाजसेवक, सुफी सय्यद शमशोद्दीन यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर व माता रमाई यांच्या जीवनावर सडेतोड व्याख्यान दिले. या वेळी मोठया प्रमाणात जण समुदाय उपस्थित होता. या कार्यक्रमाचे आयोजन जयंती कमिटीने सुंदर अशा प्रकारे केले होते.

यावेळी प्रमुख व्याख्याते सुफी सय्यद शमशोद्दीन, चंद्रकांत वायाळ, मराठवाडा कार्याध्यक्ष, महाराष्ट्र पोलीस मित्र सोशल असोसिएशन (महाराष्ट्र राज्य), व वारकरी संप्रदायाचे जिल्हाध्यक्ष ह भ प महादेव महाराज आडसूळ यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे अध्यक्ष युवराज शिंदे, ज्येष्ठ नेते आत्मराम रणदिवे, श्रीकांत गाडे,व इतर सर्व कमिटीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, खजिनदार,व इतर कमिटीचे सर्व सदस्य यानी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

# कळंब येथील संजय घोगरे यांना राजकीय लोकनेता पुरस्कार जाहीर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



कळंब/प्रतिनिधी : कळंब येथील राजकीय नेते तथा भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष मा. श्री. संजय घोगरे यांना दै. लोकनेता परिवाराकडून राजकीय लोकनेता पुरस्कार नुकताच जाहीर करण्यात आला आहे.

कळंब येथील राजकीय नेते मा. श्री. संजय घोगरे यांनी अगोदर काँग्रेसचे तालुकाध्यक्ष असताना सर्वसामान्य नागरिकांच्या कामासाठी महत्त्वाचे योगदान दिले होते. त्यानंतर भाजपामध्ये त्यांनी प्रवेश केला, तिथेही त्यांना भाजपा जिल्हा उपाध्यक्ष पद मिळाले. या पदाच्या माध्यमातूनही घोगरे यांनी तालुक्यातील जनतेच्या विविध कामांसाठी आपले सतत योगदान दिले आहे.

या सर्व राजकीय प्रवासाची दखल घेत दै. लोकनेता या गेवराई येथून प्रसिद्ध होणाऱ्या दैनिकाने नुकताच मा. संजय घोगरे यांना लोकनेता पुरस्कार जाहीर केला आहे. लवकरच एका कार्यक्रमात घोगरे यांना पुरस्काराने सन्मानित केले जाणार आहे.

घोगरे यांना लोकनेता हा पुरस्कार जाहीर झाल्याने सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन केले जात आहे.

# तेज न्यूज चे संपादक श्री प्रशांत माळवदे यांचा श्री संभाजी शिंदे शिवसेना नेते यांच्या हस्ते यथोचित सन्मान



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या वतीने मंदिर समितीचे सदस्य व सोलापूर जिल्हा शिवसेना अध्यक्ष श्री संभाजी शिंदे यांच्या हस्ते शाल, पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला.

यावेळी भाळवणीचे उपसरपंच नितीन शिंदे उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना माळशिरस शहर प्रमुख अशोक देशमुख, श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे व्यवस्थापक श्री प्रवीण कुमार धम, पोलीस अधिकारी नितीन होळकर व मंदिर समितीचे कर्मचारी उपस्थित होते.

# मुली व महिलांच्या सुरक्षेसाठी निर्भया पथकांची विशेष मोहीम



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : दिल्लीत घडलेल्या निर्भया प्रकरणानंतर २०१३ स*** निर्भया फंडांची स्थापना करण्यात आली सदर फंडातून महिलांचे सुरक्षित करिता निर्भया पथकाची स्थापना करण्यात आली असून याची सुरुवात मुंबई येथून २६ जानेवारी २०२२ रोजी पासून करण्यात आले आहे याच धरतीवर निर्भया पथक संपूर्ण महाराष्ट्र राज्यामध्ये कार्यरत करण्यात आले. दिनांक ०९/०४/२०२६ रोजी पंढरपूर विभागामधील निर्भय पथकाची पुनर्रचना करण्यात आली असून निर्भय पथकाच्या प्रभारी म्हणून म. पोलीस उपनिरीक्षक सुप्रिया यादव रावण यांनीमा. सहाय्यक पोलीस अधीक्षक प्रशांत डगळे, यांच्या मार्गदर्शनाखाली पदभार स्वीकारला आहे. तसेच सदर निर्भय पथकातील इतर सदस्य पो.को.१२३६ सावंत, पो.को.१३९५ कुचेकर, चार.पो.को.७२ टिंगरे, म.पो.को.१३११ वाघमारे, म.पो.को.२०४८ काही अशी रचना आहे निर्भय पथकामार्फत मुली व महिलांवरील अत्याचार विनयभंग, टिंगल टवाळी मारहाण, सोशल मीडियाद्वारे ब्लॅकमेलिंग पाटलाग, सारे गो मानसिक त्रास, इत्यादी बाबत सदैव तत्पर राहून पंढरपूर युगातील प्रत्येक शाळा व कॉलेज, तसेच खेडगाव पर्यंत पोहोचवण्याचा निर्धार निर्भय पथकाने केला असून यासाठी एक क्यू आर कोड प्रत्येक शाळेमध्ये व खेड्यामध्ये गाव व शाळेमध्ये पोस्टाद्वारे लावण्यात येणार असून प्रत्येक मुलीच्या त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी निर्भय पथकात पोहोचण्याचा मार्ग सुखकर करण्यात आला आहे. तसेच निर्भय पथकाने कार्यालय हे पंढरपूर शहर पोलीस ठाण्याजवळ निर्भया कक्षअसे असेल व हे २४ तास कार्यरत असेल.

## कार्यक्रम नसून विद्यार्थ्यांच्या वर्षभरातील कष्टांचा उत्सव

# कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयात पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : रयत शिक्षण संस्था संचलित कर्मवीर भाऊराव पाटील स्वायत्त महाविद्यालयात पारितोषिक वितरण समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. बी. टी. जाधव होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे माजी सचिव तथा सेवानिवृत्त प्राचार्य डॉ. जे. जी. जाधव उपस्थित होते. तसेच जनरल बॉडी सदस्य अमरजीत पाटील, ॲड. गणेश पाटील व ज्योतीराम भायगुडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रमुख पाहुणे डॉ. जे. जी. जाधव यांनी आपल्या भाषणात, पारितोषिक वितरण हा केवळ कार्यक्रम नसून विद्यार्थ्यांच्या वर्षभरातील कष्टांचा उत्सव असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांनी उच्च ध्येय ठेवून सातत्याने प्रयत्न करावेत, अपयशाची भीती न बाळगता पुढे वाटचाल करावी, असे आवाहन त्यांनी केले. लहान ध्येय ठेवणे हीच खरी चूक असून मोठ्या उद्दिष्टांसाठी प्रयत्न करत राहणे आवश्यक आहे, असे ते म्हणाले. विद्यार्थ्यांच्या यशामागे शिक्षकांचे मार्गदर्शन महत्त्वाचे असल्याचे त्यांनी नमूद करत सर्व शिक्षकांचे कौतुक केले.

अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. बी. टी. जाधव यांनी महाविद्यालयातील ऊर्जावान वातावरण, सक्षम शिक्षकवर्ग व विद्यार्थ्यांचा उत्साही सहभाग यामुळे संस्थेची प्रगती होत असल्याचे सांगितले. महाविद्यालयात कला, वाणिज्य, विज्ञान, क्रीडा व वायय महोत्सवांचे आयोजन करून विद्यार्थ्यांना व्यापक संधी उपलब्ध करून दिल्या जात असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. प्रत्येक विद्यार्थ्याचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी महाविद्यालय कटिबद्ध असून शिक्षणासोबत कौशल्यविकास व रोजगाराच्या संधी निर्माण करण्यावर भर दिला जात आहे, असेही त्यांनी सांगितले.




या कार्यक्रमाचे प्रास्ताविक पदव्युत्तर विभागाचे अधिष्ठाता डॉ. बाळासाहेब बळवंत यांनी केले, तर प्रमुख पाहुण्यांचा परिचय जिमखाना समितीचे प्रमुख डॉ. उमेश साळुंखे यांनी करून दिला. यावेळी मंचावर कला विभागाचे उपप्राचार्य डॉ. भगवान नाईकनवरे, विज्ञान विभागाचे उपप्राचार्य डॉ. राजेश कवडे, वाणिज्य विभागाचे उपप्राचार्य व अधिष्ठाता डॉ. सुशील-कुमार शिंदे, कला विभागाचे अधिष्ठाता डॉ. समाधान माने, विज्ञान विभागाचे अधिष्ठाता डॉ. अनिल चोपडे, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. रमेश शिंदे व प्रा. विठ्ठल फुले आदी मान्यवर उपस्थित होते.

या समारंभात राष्ट्रीय, विभागीय व विद्यापीठ स्तरावर विविध कला व क्रीडा स्पर्धांमध्ये उल्लेखनीय यश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. तसेच पीएच.डी., पेटंट व विविध पुरस्कार प्राप्त विद्यार्थी व शिक्षकांचा गौरव करण्यात आला.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. कुबेर गायकवाड व प्रा. रोहिणी बावचकर यांनी केले. शेवटी आभार प्रदर्शन प्रा. डॉ अमर कांबळे यांनी केले. कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व विभागांचे विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बार्टी संस्थेमार्फत यु.पी.एस.सी. केंद्रिय सशस्त्र पोलीस दल मुलाखत परीक्षा २०२५ साठी आर्थिक सहाय्य योजना

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे मार्फत यु.पी.एस.सी. केंद्रिय सशस्त्र पोलीस दल (CAPF) मुलाखत परीक्षा (UPSC CAPF - Personality Test Examination) या परीक्षेस पात्र असलेल्या महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातीच्या उमेदवारांना मुलाखत परीक्षेच्या तयारीसाठी प्रती विद्यार्थी रक्कम रु. २५,०००/- आर्थिक सहाय्य देण्यात येणार आहे.

दि. १७ एप्रिल २०२६ रोजी संघ लोकसेवा आयोगाने केंद्रिय सशस्त्र पोलीस दल (CAPF) मुख्य परीक्षेचा निकाल घोषित केला आहे. सदर निकालानुसार केंद्रिय सशस्त्र पोलीस दल (CAPF) Personality Test Examination करिता पात्र असलेल्या उमेदवारांना एकरकमी रक्कम रु. २५,०००/- चे आर्थिक सहाय्य देण्यात येत आहे. त्याबाबत सविस्तर जाहिरात व ऑनलाईन फॉर्म बार्टी संस्थेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आला आहे. जास्तीत जास्त पात्र उमेदवारांनी सदर योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन बार्टी संस्थेमार्फत करण्यात येत आहे. अधिक माहितीसाठी http://barti.maharashtra.gov.in NOTICE BOARD UPSC CAPF Assistant Commandant Service - Personality Test Examination 2026 Financial assistance Scheme येथे भेट द्यावी.

# सांगवी बु येथे अखंड हरीनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्यास सुरुवात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : तालुक्यातील सांगवी बु येथे श्री गुरुवर्य अप्पासाहेब वासकर महाराज फडा तर्फे श्री ह भ प गुरुवर्य राणा महाराज वासकर यांचे कृपाआशीर्वादाने श्री नृरसिंह जयंती निमित्त सांगवी बु येथे अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा व तपपूर्ती सोहळा आयोजित केला असून, या सप्ताह मध्ये दैनंदिन कार्यक्रम असून, दरम्यान पहाटे ४ ते ६ काकडा भजन, सकाळी ७ ते ११ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण वाचन, दुपारी २ते ३ गाथा भजन, सायंकाळी ४ते ६ हरिपाठ, सायंकाळी ६ते ७प्रवचन, रात्री ८ ते १० कीर्तन व रात्री ११ ते ४ हरिजागर असे नित्यानेम कार्यक्रम रूपरेषा असून, या दरम्यान गावातील बाहेरगावाहून येणाऱ्या व श्रोते, वाचक यांच्यासाठी सकाळी चहा, नाष्ट, दुपारचे जेवण, संध्याकाळचे जेवण, असे नियोजन असून, गावातील अनेक आन्नदात्यांनी या सप्ताह काळात अन्नदानाचे नियोजन केले आहे.

## अखंड १२ वर्षपूर्ण तपपूर्ती नेत्रदीप सोहळा

या अखंड हरीनाम सप्ताह तपपूर्ती सोहळ्यास पंचक्रोशीतील नागरिकांनी उपस्थित लावण्याचे आवाहन सप्ताह कमिटीच्या वतीने करण्यात आले आहे.